स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



**ACADEMIC (Affiliation) SECTION**

**Phone: (02462) 229242 / 43**
**Fax : (02462) 229245 / 229325**
**Website: www.srtmun.ac.**
**E-Mail ID: affi.srtmun@gmail.com**

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## जाहीर प्रगटन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रात शैक्षणिक वर्ष २०१६–१७ करिता सुधारीत बृहत आराखडयात प्रस्तावित केलेल्या ठिकाणी नवीन महाविद्यालये व प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांसाठी अभ्यासक्रम/विषय/विद्याशाखा/तुकडी इत्यादीसाठी सादर करावयाचे विहीत नमुन्यातील आवेदनपत्र / प्रस्ताव, महाराष्ट्र शासनाच्या दि. ३०/१०/२०१० व दि. ०२/०९/२०१३ चे निर्णय सर्व परिशिष्टांसह विद्यापीठाचा बृहत आराखडा ( Perspective Plan २०१६.१७ ) विद्यापीठाच्या संकेस्थळावर दि. १४ डिसेंबर, २०१५ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. संबंधीतांनी नवीन महाविद्यालये व संलग्नित महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम /विषय /विद्याशाखा/तुकडी साठी निकषास पात्र असलेले आवेदनपत्र/प्रस्ताव, दि. ३०/१०/२०१० च्या शासन निर्णयात नमुद परिशिष्ट 'अ' सह पूर्णपणे भरून विहीत शुल्कासह व दि. ०२/०९/२०१३ च्या शासन निर्णयात नमुद परिशिष्ट 'ब' नुसार आवश्यक सर्व कागदपत्रे प्रत्येक प्रस्तावास क्रमाने लावून विद्यापीठात (महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ८२ (३) अन्वये सुधारीत) दि. ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत सादर करावा.

महाराष्ट्र शासनाचे दि. ३०/१०/२०१० व दि. ०२/०९/२०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार व विद्यापीठ अनुदान आयोग ( विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्निकरण ) विनियम २००९ नुसार नमूद केलेल्या विनियमातील तरतूदीनुसार व बृहत आराखडयामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संलग्निकरणाची मागणी करण्यापूर्वी आवश्यक जमीन, विहीत क्षेत्रफळ असलेल्या प्रशासकीय, शैक्षणिक आणि इतर इमारती, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपलब्धता, वीज, पाणी, स्वच्छतागृह इत्यांदींची व्यवस्था, विनियमातील तरतूदीनुसार ग्रंथालय, प्रयोगशाळा, सभागृह, सुयोग्य फर्निचर, तासिकांसाठी खोल्यांची व्यवस्था इत्यादी सर्व बाबींची उपलब्धता असणे आवश्यक आहे. त्यामुळे नवीन महाविद्यालयासाठी प्रस्ताव /आवेदनपत्र सादर करण्यापूर्वी संबंधीतानी या बाबत खातरजमा करून घ्यावी. त्याच प्रमाणे संपूर्ण प्रस्तावाची आणि संस्थेच्या प्रस्तावित महाविद्यालयाचे छायाचित्रण अथवा व्हिडीओ शुटींग करून त्याची डी.व्ही.डी प्रस्तावाच्या प्रत्येक प्रतीसोबत जोडण्यात यावी. परिशिष्ट 'ब' नुसार आवश्यक सर्व कागदपत्रे प्रस्तावासोबत सादर केलेल्या संस्थेच्या प्रस्तावित महाविद्यालयासाठी परिशिष्ट 'ब' नुसार तपासणी करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठामार्फत पाहणी समिती पाठविण्यात येईल. सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ८२ नुसार प्रस्ताव अर्ज नमुना विद्यापीठ संकेत स्थळ srtmun.ac.in वरून News/Circular-BCUD या शिर्षकावरून Download करून कुलसचिव यांचे नावे सादर करुन शैक्षणिक विभागात ०५(पाच) प्रतीमध्ये दाखल करावे. तसेच सदरील प्रस्ताव विद्यापीठाच्या प्रकाशन विभागामध्ये विक्रीसाठी देखील उपलब्ध आहेत.

**नोट:– पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र प्रस्ताव दाखल करण्यात यावेत.**

संदर्भ शैक्षणिक/संलग्न–०३/२०१५–१६/१९३५
दिनांक : १२/१२/२०१५
स्थळ : नांदेड

**कुलसचिव**